# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/११७६ /2022-23 दि. २५/०८ /2022

संदर्भ :- 1) जा.क्र.मनपा/आस्था/688/2021-22, दि.22/06/2021 रोजीचा आदेश.
2) जा.क्र.मनपा/आस्था/1104/2021-22, दि.12/08/2021 रोजीचा प्रत्यायोजन आदेश.
3) जा.क्र.मनपा/आस्था/1588/2021-22, दि.29/10/2021 रोजीचा प्रत्यायोजन आदेश.

<u>सुधारित प्रत्यायोजन आदेश</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाची व्याप्ती विचारात घेता कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी व सर्व कामे विहित वेळेत होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 39 (अ) अन्वये, खालील दर्शविलेल्या खात्यांचे व विभागांचे प्रशासन आणि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणात असलेल्या विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्ये, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त 1 व अतिरिक्त आयुक्त 2 यांचेकडे खालीलप्रमाणे सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अतिरिक्त आयुक्त (1) यांचेकडे सोपविण्यात आलेले विभाग<br>श्री. अनिकेत मानोरकर | अतिरिक्त आयुक्त (2) यांचेकडे सोपविण्यात आलेले विभाग<br>श्री. संभाजी पानपट्टे |
|---|---|---|
| 1) | मालमत्ता कर विभाग | सार्व. आरोग्य विभाग (साफसफाई) |
| 2) | सामान्य प्रशासन व आस्थापना विभाग | शिक्षण विभाग |
| 3) | स्थानिक संस्था कर विभाग | समाजविकास विभाग (एन.यु.एल.एम) |
| 4) | वाहन विभाग | वैद्यकीय आरोग्य विभाग |
| 5) | लेखा विभाग | परवाना विभाग |
| 6) | निवडणूक विभाग | जाहिरात विभाग |
| 7) | भांडार विभाग | लेखा परिक्षण विभाग |
| 8) | जनगणना विभाग | ई-टेंडरिंग, सि.सि.टी.व्ही. विभाग |
| 9) | अभिलेख विभाग | संगणक व नागरी सुविध केंद्र |
| 10) | ग्रंथालय विभाग | बाजार लिलाव विभाग |
| 11) | परिवहन विभाग | पे एण्ड पार्क, भुईभाडे विभाग |
| 12) | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग | महिला व बालकल्याण विभाग |
| 13) | सुरक्षा विभाग | पशुसंवर्धन विभाग |
| 14) | पर्यावरण विभाग | क्रिडा विभाग |

संबंधित अतिरिक्त आयुक्त यांनी वरील विभगांचे कामकाज, वेळोवेळी त्यांना प्रत्ययोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकाराच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. संबंधित उपायुक्त यांनी त्यांचे विभागातील प्रस्ताव त्यांच्या अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पुर्व मान्यतेने व मंजुरीने पाठविणे बंधनकारक राहील.

D/Nayna/बदलीvआदेश

रुपये 10 लक्ष रकमेवरील ते रुपये 25 लक्ष रकमेपर्यंतचे ठेकेदार / पुरवठादार यांच्या प्रदानासाठीची देयके मंजुर करण्याचे अधिकार त्या त्या विभागातील अतिरिक्त आयुक्त यांना असतील. मात्र धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार मुख्यलेखाधिकारी व उप-आयुक्त (मुख्यालय) यांना राहतील.

तसेच रुपये 25 लक्ष रकमेवरील ठेकेदार / पुरवठादार यांची प्रदानासाठीची देयके मंजुरीचे अधिकार आयुक्तांकडे अबाधीत राहतील. तथापि धनादेशावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार मुख्यलेखाधिकारी व उप-आयुक्त (मुख्यालय) यांना राहतील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी, हया सर्व प्रयोजनासाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत, असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 39 (अ) नुसार मानले जाईल.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-

1) अतिरिक्त आयुक्त - 1
2) अतिरिक्त आयुक्त - 2
3) उपायुक्त (सर्व)
4) मुख्यलेखापरिक्षक
5) मुख्यलेखाधिकारी
6) खातेप्रमुख / विभागप्रमुख (सर्व)

प्रत :- माहितीस्तव :-

मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभापती, परिवहन समिती.

D/Nayna/बदलीv आदेश